# अंमली पदार्थ विरोधी कक्ष,
# गुन्हे शाखा, बृहन्मुंबई

**-: प्रेस नोट :-** **दिनांक - ०५/०९/२०२६**

**मुंबई उपनगरात हेरॉईन या अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या ०२ आरोपींना अटक करुन ६५ लाख रुपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त.**

| | | |
|---|---|---|
| **गु.र.क्र. व कलम** | :- | गु.र.क्र. ८२/२०२६ (वर्सोवा पो.ठाणे, गु.र.क्र. १२०५/२०२६), कलम ८ (क) सह २१ (क), २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५. |
| **दाखल दिनांक** | :- | दिनांक ०४/०९/२०२६ रोजी २१:४० वा. |
| **गुन्हयाचे घटनास्थळ** | :- | वर्सोवा, अंधेरी (प.), मुंबई. |
| **आरोपीची संख्या** | :- | ०२ |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | :- | एकुण ३२३ ग्रॅम वजनाचा हेरॉईन, अं.किं.रु. ६४,६०,०००/- व एक इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, सॅकबॅग, मिक्सर भांडे, हॅलोजन बल्ब, दोन मोबाईल फोन |

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई सो. यांचे आदेशान्वये मुंबई व मुंबई उपनगरामध्ये अंमली पदार्थाची तस्करी तसेच खरेदी विक्री करणाऱ्या इसमांचा शोध घेवुन त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, गु.अ.वि, मुंबई यांचेकडुन विशेष मोहिम हाती घेण्यात आली आहे.

दिनांक ०४/०९/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे कांदिवली युनिटने गुप्त बातमीदारांकडून माहिती प्राप्त करुन वर्सोवा येथे सापळा रचून कारवाई करुन मुंबई परिसरात अवैधपणे विक्री करीता आणलेला खालील प्रमाणे नमुद अंमली पदार्थ जप्त करुन एकुण ०२ आरोपीतांना अटक करुन खालीलप्रमाणे कारवाई केली आहे.

**आरोपीतांच्या सॅकबॅग मधून एकूण १६७ ग्रॅम वजनाचा हेरॉईन, अं.किं.रु. ३३,४०,०००/-**
**आरोपीतांच्या सॅकबॅग मधून एकूण १५६ ग्रॅम वजनाचा हेरॉईन, अं.किं.रु. ३१,२०,०००/-**
**एकुण हस्तगत ३२३ ग्रॅम वजनाचा हेरॉईन हा अंमली पदार्थ, अं.किं.रु. ६४,६०,०००/-**

अशा प्रकारे ०२ अटक आरोपीतांकडे एकुण ३२३ ग्रॅम वजनाचा हेरॉईन हा अंमली पदार्थ, एकुण किं. रु. ६४,६०,०००/- मिळुन आल्याने त्यांचे विरुद्ध दिलेल्या तक्रारी वरुन अं.प.वि.कक्ष कांदिवली युनिट गु.र.क्र. ८२/२०२६, कलम ८ (क) सह २१(क),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला **असुन आरोपीतांना सदर गुन्हयात दिनांक ०४/०९/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी ही मा.श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा.श्री.अनिल कुंभारे, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), मा.श्री. कृष्णकांत उपाध्याय, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), मा. श्रीमती पूर्णिमा चौगले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई व मा. श्री. सुधीर हिरडेकर, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्ष (गुन्हे शाखा) अंतर्गत कांदिवली युनिट येथील प्रभारी पोलीस निरीक्षक, श्री. राहूल लोखंडे, स.पो.नि. विजय नाईक व पथक यांनी केली आहे.

----000----